International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# अमृतानुभव आणि ईशावास्योपनिषदातील आत्मस्वरूप

**रामदास नारायण दराडे**

मराठी संशोधन केंद्र, पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

**प्रास्ताविक:-**

मणुष्य हा निसर्गाकडे कधी भितीने तर कधी आश्चर्याने पाहू लागला. निसर्गातील प्रत्येक गोष्ट ही एका विशिष्ट नियमाला अनुसरून घडते. याचे आकलन करून, हे जे विश्व संचालन आहे, याची संचालक शक्ती एक आहे. असे लक्षात आल्यावर, या विश्वरचनेवर अनेकांनी विचार केला असेल. त्यामध्ये प्राचीन ऋषिमुनींचा अंतर्भाव होतो. ऋषिमुनींनी सुद्धा एकांतात राहून याचा विचार केला व त्यांना जी प्रचिती आली ती त्यानी ऋचांच्या रुपात सांगीतली. या विश्वात घडणाऱ्या प्रत्येक क्रियेच्या मागे एक शक्ती आहे व ती संपूर्ण विश्वाला व्यापून असणारी शक्ती तिला ऋषिमुनींनी ईश्वर असे संबोधले. त्या शक्तीचे अनेक स्तोत्र त्यांनी गायले. अनेक रुपात त्या शक्तीची मांडणी करून, त्या शक्तीसच आत्मस्वरूप असे म्हटले आहे. अनेकांनी अनेक पद्धतीने त्या आत्मस्वरूपाचे वर्णन केले. त्या आत्मस्वरूपास जाणून घेण्यासाठी अनेक मार्गांचे कथन केले आहे. साधन मार्ग जरी अनेक असले तरी प्रत्येकाचे साध्य मात्र एकच आहे. ते साध्य म्हणजेच आत्मस्वरूपाची ओळख. मग त्या आत्मस्वरूपाचे दर्शन ज्या ऋषीला जसे झाले तसे त्याने मंत्रांतून मांडले. त्या सर्व मत्रद्रष्ट्या ऋषींच्या मंत्रांचे संकलन म्हणजेच वेद होत. भारतीय तत्त्वज्ञानात वेदांना अत्यंत महत्त्व आहे. वैदिक साहित्य हे मानवी मनाचा आद्य आविष्कार आहे. वेद हे अतिप्राचीन आहेत असे प्राचीनतेच्या दृष्टीनेही, वेदांच्या संदर्भात बहुतांश विचारवंतांचे एकमत आहे. मुळात वेद हा पूर्वी एक होता, त्याचे व्यासांनी चार भाग केले अशी माण्यता परंपरागत चालत आलेली आहे. ऋग्वेदात इंद्राग्निवरुणादि देवांच्या प्रार्थना आहेत. यजुर्वेदात यज्ञविधीची पद्धती व मीमांसा आहे. सामवेदात मंत्र गायनाचे पद्धतीशास्त्र आहे. अथर्ववेदात रहस्यमयी विद्या आहेत. वेदाच्या अंतिम भागात उपनिषदे अंतर्भूत आहेत. यांनाच वेदांत असे देखील म्हणतात. उपनिषदांत देवतांच्या प्रार्थना नाहीत व देवांकडे कोणत्याही प्रसादासाठी याचना नाही. सर्व देवता ज्या एका आत्म्याची प्रतिबिंब आहेत, त्या आत्म्याचे स्वरूप व त्या आत्मानंदाचे दर्शन घडवून आणण्यासाठीचे ज्ञान, उपनिषदांनी कथन केले आहे. उपनिषदांची संख्या अनिश्चित आहे. परंतु मध्ययुगीन कालखंडात श्री शंकराचार्यांदी आचार्यांनी दहा उपनिषदांना प्राचीनतम आणि उत्कृष्ट ठरवून त्यावरच त्यांनी आपली भाष्ये लिहिली आहेत. त्या दहा उपनिषदातील ईशावास्य हे पहिले उपनिषद आहे. हे शुक्ल यजुर्वेदीय उपनिषद आहे. शुक्ल यजुर्वेदास 'वाजसनेय संहिता' म्हणतात. या संहितेचे चाळीस अध्याय असून चाळीसावा अध्याय म्हणजेच ईशावास्य उपनिषद होय. अध्यात्मिक वाङ्मयातील ईशावास्य उपनिषदाचे स्थान अत्यंत उच्च आहे. त्याच पद्धतीने संत ज्ञानेश्वरांच्याही वाङ्मयाचे स्थान अध्यात्म वाङ्मय महत्वाचे आहे. संत ज्ञानदेवांनी आपल्या वाङ्मयात वेदमतांचा काही अंशी स्वीकार केलेला आहे. ज्या गोष्टी स्वीकारणीय नाहीत त्या त्यांनी टाकलेल्या देखील आहेत. आवश्यकता असेल तेथे योग्य बदल करून एखाद्या सिद्धांताला शुद्ध केलेले आहे. संत ज्ञानदेवांच्या वाङ्मयातील साहित्यिक मूल्ये ही सुद्धा महत्त्वाचे आहेत.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीकोनातून संत ज्ञानदेवकृत वाङ्मयात अमृतानुभ या ग्रंथाचे अग्रीम स्थान आहे. या ग्रंथात ज्ञानदेवांनी शुद्ध आत्मानुभवाच्या आविष्काराची भूमिका स्वीकारली आहे. अमृतानुभवाची एकुन दहा प्रकरणे आहेत. ईशावास्योपनिषद आणि अमृतानुभवातील आत्मस्वरूप हे बहुतांश साम्य आहे. कुठे-कुठे भेद आहे. ती समता व भिन्नता कश्या पद्धतीची आहे हे सदर अभ्यासात पाहायचे आहे.

पहिल्या प्रकरणात पाच संस्कृत श्लोकांपैकी "यदक्षरं अनाख्येयं" इत्यादी पदांनी गुरु निवृत्तीनाथांचे वर्णन केले आहे. पुढील तिसऱ्या व चौथ्या श्लोकात प्रकृतीपुरुषांचे स्वरूप सांगून वंदन केले आहे. पाचव्या श्लोकात आदि, मध्य, अंत या जगताच्या ज्या अवस्था आहेत त्या सद्गुरु च्या ठिकाणी नाहीत. सद्गुरु हे या अवस्थांच्या परे आहेत हे सांगून नमस्कार केला आहे. व पुढे संपूर्ण प्रकरणात प्रकृतीपुरुषांचे वर्णन आहे. ज्ञानमात्र आत्मस्वरूपावर आधारित प्रकृतीपुरुष या एकमेकांच्या सापेक्षत्त्वाने आलेल्या कल्पना आहेत. हा या प्रकरणाचा सारांश आहे.

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

**जया एक सत्तेचे बैसणे / दोघा एका प्रकाशाचे लेणे**
**जे अनादि एकपणे / नांदती दोघे// अमृ. अ-१/६**

प्रकृतीपुरुष हे स्वतःच्या मुळ रुपात असोत की कार्यरुपाने जगत्स्थितीने असोत, ती तत्त्वतः एकरुपच आहेत हे जाणूनच प्रकरणाच्या शेवटी त्यांना अभेदबुद्धीने वंदन केले आहे.

दुसऱ्या प्रकारामध्ये सद्गुरुचे वर्णन करुन गुरु आणि शिष्याचे एकत्व दर्शविले आहे. अभेद असून देखील वर्णन व वंदन कसे केले हे सुद्धा अनेक दृष्टांत देऊन पटवून दिले आहे. या प्रकरणातील गुरु-शिष्यचे ऐक्य हे पारमार्थिक दृष्ट्या ऐक्य आहे.

तिसऱ्या प्रकरणात अविद्यात्मक चारी वाणीतून जरी सुटका झाली तरी अविद्या निवृत्त झाल्यावर तिच विद्या रुपाने प्रगट होते, म्हणजेच अविद्येचा रुपांतर विद्येत होते. मग शुध्द आत्मस्वरूपाला या विद्येचे आवरण तयार होते. मी देह आहे हे अज्ञान तर मी आत्मा आहे हे ज्ञान परंतु आत्मस्वरूप मात्र या दोन्हीहून भिन्न आहे. हेच ईशावास्य उपनिषदांत देखील थोडे वेगळेपणाने सांगीतले आहे. 'अहंब्रम्हास्मि' अश्या ज्या वैदिक महावाक्याने होणारा जो बोध आहे त्याला ज्ञान असे जरी म्हणतात तरी ज्ञानेश्वरांनी आत्मस्वरूपाच्या ठिकाणी यांची आवश्यकता नाकारली आहे.

**हा तत्त्वज्ञानाचा दिवा / मरोनी इहीं लावावा**
**तरी हाही शीण लेवा / बोधरुपेची // अमृ. अ- ३/८**

बोधरुपी आत्मस्वरूपाला प्रकाशीत करण्यासाठी तत्त्वज्ञानाचा दिवा लावणे हेही एकप्रकारचे शीणणेच आहे. आत्मस्वरूप वेगळे व बोध वेगळा असे दोन पदार्थ संत ज्ञानेश्वर मानत नाहीत. बंध मोक्षाचा व्यवहार हा आत्मस्वरूपाचे ठिकाणी नाही, असे ते सांगतात. मोक्ष संकल्पनेची ज्ञानेश्वर चिकित्सा करतात, अविद्या जीवंत असताना आत्मस्वरूपाला बंध रुपाने बांधते व ती मृत होऊन विद्यारुपाने प्रगट होते तेव्हा आत्मतत्वास मोक्ष रुपाने बांधते. यावरून आत्मत्वी बंधमोक्ष हे मिथ्या आहेत, असे लक्षात येईल. हे सांगताना ज्ञानेश्वरांनी भगवान शंकर आणि भगवान विष्णु यांचे मत असेच आहे हा पुरावा दिला आहे. अशा प्रकारे अविद्येचे बंधन जाऊन विद्येचे बंधन कसे संभवते व ते दोन्ही बंधने हे शुद्ध आत्मस्वरूपाच्या ठिकाणी कसे नाहीत हे अनेक दृष्टांतांनी सिद्ध केले आहे. हाच आशय ईशावास्य उपनिषदाच्या दहाव्या मंत्रात आहे. विद्येचे फळ हे उत्तम भोग आहे, ज्ञानमात्र आत्मस्वरूपाची प्राप्ती नाही. अविद्येचे फळ हे भिन्न सांगीतले आहे.

**अन्येदेवाहुर्विद्ययान्यदाहुरविद्यया**
**इति शुश्रुम धीरणां ये नस्तद्विचचक्षिरे//ईशा. उ.१०//**

चौथ्या प्रकरणात अविद्येचे निरसन झाले की त्याच वेळी निर्माण झालेली भेदरहीत ज्ञानवृत्ती तिचेही निरसन कसे होते व अज्ञानज्ञान या धर्माहून भिन्न ज्ञानमात्र आत्मभाव कसा असतो हे अनेक दृष्टांत देऊन सांगीतले आहे.

पाचव्या प्रकरणामध्ये ज्ञानमात्र आत्मस्वरूपाच्या ठिकाणी परमार्थतः सत्, चित्, आनंद या पदांचा संभव कसा नाही हे अनेक दृष्टांत देऊन दाखवून दिले आहे. भारतीय तत्त्वज्ञानात सच्चिदानंद या पदत्रयाला अत्यंत महत्त्व आहे. यावरच अनेक शास्त्रकारांनी विश्लेषण केले आहे. परंतु संत ज्ञानेश्वरांनी पाचव्या प्रकरणात ज्ञानमात्र आत्मस्वरूपाच्या ठिकाणी या पदत्रयाचा परमार्थतः निषेध दाखवलेला आहे. या साठी ज्ञानेश्वरांनी अनेक दृष्टांत दिले आहेत. शब्दातीत शुध्द आत्मस्वरूपाचा फक्त निर्देश करून हे मावळतात.

**तैसे सच्चिदानंदा चोखटा / दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा**
**तिन्ही पदे लागती वाटा / मौनाचिया //अमृ.अ ५/२५**

त्या आत्मस्वरूपाचे जे जे वर्णन करावे त्याहून ते भिन्नच आहे. सत्ता म्हणावे तर असत्ता कोठे आहे. द्वंद्वच नाही तर दुखः कसे असणार? तत्त्वज्ञानात द्वंद्वाला दुखःचे कारण मानलेले आहे. ईशावास्य उपनिषदात सुद्धा असे म्हटले आहे की "जिस समय ज्ञानी पुरुषके लिए सब भूत आत्मा ही हो गये, उस समय एकत्व देखनेवाले विद्वानको क्या शोक और क्या मोह हो सकता है"[१]

International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

**यस्मिन्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।**
**तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतःII ईशा. उ. ७।।**

यावरून असे म्हणता येईल की आत्मतत्व जर पुर्ण रुपाने भरुन असेल, तर द्वंद्व नाही व म्हणूनच दुःख सुद्धा नाही. दुखः नसेल तर सुख शब्दाला अर्थ नाही. अश्या रुपाने शुद्ध आत्मस्वरूपाचे ठिकाणी ईशावास्य उपनिषद आणि अमृतानुभात या दोन्ही ग्रंथांत सच्चिदानंद पदत्रय यांची अनावश्यकता कथित केलेली आहे.

सहाव्या प्रकरणात शब्द हा अव्यक्त परमतत्व अथवा माया, तिच्या वंशातील सूर्यासारखा प्रकाशक व आपल्या कुणाचे नाव उंचावणारा कुलदीप आहे. भौतिक सृष्टीचा परिचय करून देणारा हा सूर्य आहे. त्या शब्दाला ज्ञानदेव 'उद्योतकर सूर्य जैसा' असे म्हणतात. हा शब्द जर नसेल तर आकाशाची सिध्दी होत नाही. 'येणे एके गुणे आकाशा अंबरत्व' असे उद्गार काढले आहेत. शब्द हा स्वतः भासत नाही, शब्द हा परमाणूंचा एकमेकांवर आघात झाल्यावर निर्माण होतो. पण शब्द निर्माण होण्याच्या अगोदर, निर्माण झाल्यास व शब्द नष्ट झाल्यावरही त्या शब्दाचे कोणतेही वस्तुत्व नसते परंतु तो सर्व वस्तूंना प्रकाशीत करणार आहे. निर्विकार आत्मस्वरूपाच्या ठिकाणी सुद्धा शब्दानेच बंधमोक्ष कल्पना उभ्या केल्या आहेत. हा शब्दच जीवाला देह बंधनात टाकतो व ह्या शब्दामुळेच महावाक्याचा बोध होऊन जीवाला शिवरुपाचे भान होते. प्रवृत्ती व निवृत्ती या शब्दाच्या हाताला धरून चालतात. आत्मस्वरूपाचे ज्ञान होण्यासाठी हा शब्द साधकांना मदत करणारा आहे. सहाव्या प्रकरणात शब्द हा किती उपयोगाची वस्तू आहे व स्मृतिदान देण्यात ह्याचा स्वभाव किती परोपकारी आहे, तरी पण ज्ञानरूप आत्मस्वरूपाच्या ठिकाणी शब्द हा निरुपयोगी निरर्थक कसा होतो, ह्या गोष्टीचा सिद्धानुवाद अनेक दृष्टांतपूर्वक केला आहे. मात्र इतकेच आहे की सहाव्या प्रकरणाच्या पहिल्या ओवीपासून बाराव्या ओवीपर्यंत शब्दाचे मंडण केले आहे व तेथून पुढे या प्रकरणाच्या समाप्तीपर्यंत शब्दाच्या खंडणाचा प्रकार आहे.

सातव्या प्रकरणात अज्ञान हे आत्मत्वी अनादिकालापासून आहे. पण सत्य नसून मिथ्या आहे; ते सत्य का नाही, मिथ्या कसे आहे, याचा या ते प्रकरणातील ४० व्या ओवीपर्यंत अनेक दृष्टांतपूर्वक विचार सांगितला आहे. ४१ व्या ओवीमध्ये 'अज्ञान हे प्रत्यक्ष प्रमाणाला विषय होणारे आहे. अथवा अनुमान प्रमाणाला विषय होणारे आहे,' त्याचा शोध घेऊ, असा उपक्रम केला आहे. ४२ ओवीपासून १०१ ओवीपर्यंत अज्ञान हे प्रत्यक्ष प्रमाणाला विषय नसून अनुमान प्रमाणालाही विषय नाही असे ठरवून अज्ञान हा पदार्थ ज्ञानरूप आत्मत्वी मुळीच नाही, असे अज्ञानाचे खंडण केले आहे. तेथून पुढे १२२ ओवीपर्यंत ज्ञानाज्ञानधर्मरहित केवळ ज्ञानप्रकाशमान निर्विषयक आत्मवस्तूचा विचार सांगितला आहे. १२३ व्या ओवीमध्ये केवल ज्ञानरूप स्वयंप्रकाशमान निर्विषय आत्मवस्तू आहे, तरी तिने आपले निर्विषयत्व अथवा अज्ञेयत्व बाजूला ठेवून अनेक नामरूपात्मक दृश्य जगत्रूपाने आपला ज्ञानप्रकाश व्यक्त केला असे सांगितले आहे.

येव्हडे हे साकडे । जेणें सारूनि येकीकडे
उघडली कवाडे । प्रकाशाची ॥७-१२३. तेथून २६७ ओवीपर्यंत सर्व जगत् हा केवल चिद्विलास आहे, असे स्थापित केले आहे. तेथून पुढे या प्रकरणाच्या समाप्तीपर्यंत जगत् हे केवळ चित्प्रकाश असून ते अज्ञानकार्य आहे, असे म्हणणाऱ्या पूर्वपक्ष अज्ञानवाद्याचे मूर्खत्व सुचविले आहे व सगळे जग हे अज्ञानकार्य नसून जगत्मिषाने केवळ चित्प्रकाशच व्यक्त आहे, हे सांगितले आहे, इतका सिद्धानुवाद या सातव्या प्रकरणात अनेक युक्तिप्रयुक्तीने व अनेक दृष्टांतपूर्वक सांगितला आहे. या सातव्या प्रकरणात संत ज्ञानेश्वरांचा स्वतंत्र असा चिद्विलासवाद अधिक स्पष्ट झालेला आहे. हा चिद्विलासवाद ईशावास्य उपनिषदाच्या शान्तिमंत्राची विकसीत अवस्था आहे असे म्हणता येईल.

आठव्या प्रकरणात अज्ञानखंडनातील राहिलेल्या ज्ञानखंडणाचा विचार सांगितला आहे व ज्ञानाज्ञानातीतज्ञानरूप ज्ञानस्वरुपात्मवस्तूचा विचार सुचविला आहे. आत्मा या पदावरून आत असणारा असा जो अर्थ निघतो तो सुद्धा मर्यादित आहे. आत्मा नुसता आत असणारा नाही तर अंतर्बाह्य तोच एक आहे. ज्ञानेश्वरीत याचा उलगडा केलेला आहे.

**जरा आत्मा तूं एकसरा / हेंही म्हणतां दातारा / तरी आंतुला तूं बाहेरा / घापतासी//**

ज्ञानेश्वरी अ. १८ वो. २३II आत्मस्वरूपाच्या ठिकाणी मी देहरुप अशा स्वरुपाचे अज्ञान व मी ब्रह्मरूप ह्या दोन्हीही वृत्ती नसतात. अशाप्रकारे अनेक दृष्टांत देऊन हे ज्ञानाज्ञानखंडण समजावून दिले आहे.

नवव्या प्रकरणात ज्ञानाज्ञानातीत ज्ञानरूप आत्मवस्तूशी सद्गुरूप्रसादाने अभेदत्वाला पावलेल्या भक्ताकडून अवशिष्ट प्रारब्धाने होणारी सर्व शुभाशुभ कर्मे जी आहेत, ती सर्व ज्ञानी भक्ताची सिद्धभक्तिच आहे, कारण ज्ञानी भक्त हा जर ब्रह्मरूप आहे, तर त्याच्याकडून होणारी सर्व कायिक, वाचिक, मानसिक शुभाशुभ कर्मे ब्रह्मच आहेत. त्या भक्ताची कर्मे संकल्पावाचून होतात. तुकाराम महाराज म्हणतात की, "ब्रह्मरूपाची कर्मे ब्रह्मरूप । विरहित संकल्पे होती जाती ॥" अशा प्रकारच्या भक्तांच्या उपासनेला वस्तुतंत्र उपासना म्हणतात. म्हणूनच ती साहजिक सर्व व्यवहारामध्ये त्या भक्ताकडून अखंड होतच असते, असा अखंड ज्ञानोत्तरसिद्ध भक्तीचा अनुवाद अनेक दृष्टांतपूर्वक या नवव्या प्रकरणात केला आहे.

दहाव्या प्रकरणात सद्गुरुप्रसादाने प्रतीतीला आलेले अमृत म्हणजे त्रिकालाबाधित ज्ञानरूप स्वयंप्रकाशमान स्वतःसिद्ध आत्मस्वरूप त्याचा अमृतानुभव या ग्रंथमिषाने अनुवाद मी केला, परंतु हे करणे माझे नसून सर्व औदार्य सद्गुरूचे आहे, असे या प्रकरणांतील सहाव्या ओवीपर्यंत अनेक दृष्टांतांनी सुचविले आहे. तेथून पुढे सर्व पदार्थांच्या अंतर्बाह्य अस्तिभातिप्रियत्वेकरून व्यापक असणाऱ्या स्वयंप्रकाशमान सर्वत्र नित्य प्रगट अशा सद्गुरूप्रभावाच्या आड होऊन "हे सर्व तुमचेच औदार्य आहे असा परिहार कशाकरिता देऊं ? जर मी या अमृतानुभव ग्रंथमिषाने नित्यप्रकट सद्गुरुप्रभावाचा अनुवाद केला नाही तर जनांना त्याचा अनुभव होणार नाही का ? " इतके या प्रकरणाच्या ११ व्या ओवीपर्यंत सुचविले आहे. तेथून पुढे १२ व्या ओवीमध्ये 'स्वतःसिद्ध नित्य सर्व प्रकट सद्गुरुस्वरूपाचा अनुवाद केला नाही तर ग्रंथप्रस्तावना होणार नाही. म्हणून सिद्धगोष्टीचाच आवडीने अमृतानुभव या ग्रंथमिषाने अनुवाद केला आहे. पण इतकेही म्हणण्यास येथे जागा नाही. कारण सर्वत्र भेदशून्य अभेद स्थितीने एकस्वात्मत्वेकरून आमचे आम्हीच आहोत, तर तेथे कोण कशाचे वर्णन करणार? म्हणून अमृतानुभवग्रंथमिषाने सिद्धआत्मवस्तूचा अनुवाद केला नसून सर्व काही मौनाचे मौनच आहे' इतके १७ व्या ओवीपर्यंत सुचविले आहे व तेथून पुढे त्याच प्रकरणाच्या समाप्तीपर्यंत अमृतानुभवग्रंथाचे माहात्म्य वर्णन केले आहे, इतकाच सिद्धानुभव या प्रकरणामध्ये आहे. अशा प्रकारे प्रत्येक प्रकरणांचा सारांश आहे.

अमृतानुभव हा संत ज्ञानेश्वरांच्या आत्मानुभवाच्या आविष्कारातून निर्माण झालेला आहे. हे आलेल्या अनुभवाचे शब्दरूप होय. अमृतानुभवाच्या प्रतिपादनाचा विषय हा आत्माच आहे. हे संत ज्ञानेश्वर या ग्रंथात सांगतात.

**आम्ही बोलिलो जे काही / ते प्रगटची असे ठाई**
**मा स्वयंप्रकाशा काही / प्रकाशावे बोले // अमृ. अ. १०/८**

आत्म्याचा आलेला अनुभव प्रकट करतात. हा अनुभव आहे अन्य ग्रंथाचा आधार देऊन केलेले विश्लेषण नाही. किंवा कोणतीही शास्त्रीय चर्चा नाही. हे स्वानुभव कथन आहे. हा ग्रंथ अन्य एखाद्या ग्रंथावर, विचार प्रणालीवर आधारलेला नसून तो स्वानुभूतीवर आधारित आहे.

"अमृतानुभ हा ज्ञानदेवांचा स्वतंत्र ग्रंथ. त्यांच्या तत्त्वदर्शी प्रतिभेचे हे दिव्य अपत्य. ज्ञानदेवांना स्वतंत्र दर्शनकार म्हणून मान्यता मिळावी एवढे त्याचे निर्विवाद महत्त्व" [२] यावरून असे म्हणता येईल की संत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभाच्या माध्यमातून एक स्वतंत्र तत्त्वचिंतन मांडले आहे. गीता भाष्य करत असताना ज्ञानेश्वरीत वेदांना गौरविण्यात आले आहे परंतु अनुभवामृतामध्ये वेदांचा गौरव कोठेही आढळून येत नाही. यावरून संत ज्ञानेश्वर हे एक स्वतंत्र दर्शनकार आहेत. वैदिक ऋषिमुनींना झालेले आत्मदर्शन त्यांच्या मुखातून बाहेर येऊन त्याच्या ऋच्या झाल्या अगदी त्याच प्रमाणे संत ज्ञानेश्वरांना देखील आत्मस्वरूप दर्शन झाल्यावर त्यांच्या मुखातून जे शब्द बाहेर पडले ते शब्द म्हणजेच अमृतानुभ होय. ते शब्द सुद्धा ऋच्या आहेत असे म्हणता येईल. या आत्मस्वरूपाच्या अधिकारासाठी ज्ञानदेवांनी कोणतीही अट ठेवलेली नाही, ही ज्ञानदेवांची नव्यताच म्हणता येईल. या आत्मस्वरूपाचे ज्ञान प्रत्येकाच्या कानापर्यंत जावे ही अपेक्षा अमृतानुभवातून ज्ञानेश्वरांची दिसते.

**म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे / अनुभवामृते येणे**
**सणु भोगिजे सणे / विश्वाचेनि// अमृ.अ-१०/३१**

ईशावास्योपनिषदाच्या संदर्भात तसे म्हणता येणार नाही. कारण वैदिक ज्ञान हे सर्वसामान्यांच्या कानापर्यंत पोहचत नसे. अमृतानुभवात आनंदाचा उपभोग हा विश्वासाठी खुला आहे हे वरील वोवीतून लक्षात घेता येईल.

आत्मा अज्ञानामुळे अनुभवाला येत नाही व ज्ञानाने तो गोचर होतो असे आजतागायत सर्व शास्त्र व शास्त्रकार सांगत आले आहेत. ईशावास्योपनिषदामध्ये देखील ज्ञानाचे उपासक हे अज्ञानी लोकांपेक्षा घोर अंधकारात असतात असे म्हटले आहे.

**अन्धंतमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते**
**ततो भूय इव ते तमो य उ विद्यायांरताः ॥ईशा. उ.९॥**

"जे कर्माचा त्याग करून केवळ देवताज्ञानामध्ये रत असतात ते त्यापेक्षांहि घोर अशा अंधकारामध्यें प्रवेश करतात" [३] ज्ञानदेवांनी आत्मस्वरूपाला प्रकाशीत करण्यासाठी ज्ञानाची प्रतिष्ठा शुन्य मानली आहे. आत्मतत्व हे ज्ञानाज्ञानाच्या पलीकडे आहे असे ते सांगतात.

**म्हणोनी ज्ञाने उजळे / का अज्ञाने रुळे**
**तैसे नव्हे निर्वाळे / ज्ञानमात्र जे // अमृ. अ-४/१७**

अश्या प्रकारे आत्मस्वरूप हे निर्गुण, निराकार, भेदशुन्य, ज्ञानमात्र आहे असे ज्ञानदेव ठिकठिकाणी प्रतिपादीत करतात. ईशावास्योपनिदाने आत्मस्वरूपाला सर्वव्यापकच सांगीतले आहे. अनेजत्- अचल, एकम्- एक, पूर्वम्- सर्वांचे आदि, अर्षत्- ज्ञानस्वरूप अश्या शब्दातून वर्णन आलेले आहे. पाचव्या श्लोकात आत्मतत्व संपूर्ण विश्वाच्या आतून आणि बाहेरून पूर्ण भरलेले आहे असा आशय आहे. पुढे आठव्या श्लोकामध्ये ते आत्मतत्व तेजोमय, शुद्ध आहे असा आशय आहे. ज्ञानेश्वर सांगतात की वेदाची शब्दसंपदा फार मोठी जरी असेल तरी तो आत्मस्वरूपाच्या कथनाच्या बाबतीत मात्र मुकाच राहीला आहे.

**वेदु काय काय न बोले / परी येथें नांवची नाहीं घेतले**
**ऐसे कांहीं जोडलें / नाहीं जेणें // अमृ.अ-७/१०७**

आत्मस्वरूप हे वेद, शब्द, शास्त्र, पुराणे, चारी वाणी यांच्या वर्णनाच्या हातात सापडेल असे नाही. हाच परमात्मा, हेच ज्ञानमात्र, हेच अनुभवामृत, गुरुही हाच, हे आत्मस्वरूप संपूर्ण चराचरात भरून आहे. त्या पूर्ण स्वरुपचे हे पूर्णविश्व रुप आहे. त्या पूर्णातून पूर्ण वजा केले तरी पूर्णच शिल्लक राहाते. असा ईशावास्य उपनिषदाच्या शान्तिमंत्राचा अर्थ आहे. त्या आत्मस्वरूपाचे कितीही वर्णन केले तरी ते पूर्ण होणार नाही. ज्ञानदेव सांगतात की अमृतानुभवाच्या रुपाने जरी आत्मस्वरूपाचे वर्णन केले असले तरी मौनाचे मौनच आहे. जसे की पाण्यावर मास्याचे चित्र काढून पाहू लागल्यास ते पाणीच दिसते तसे हे वर्णन आहे.

**निष्कर्षः-**

१) संत ज्ञानेश्वरांनी अमृतानुभवात मांडलेल्या चिद्विलासवादाचे बीज ईशावास्य उपनिषदात सापडते.
२) संत ज्ञानेश्वर हे स्वतंत्र दर्शनकार आहेत.

**संदर्भसूची :-**

१) ईशादि नौ उपनिषद, शांकरभाष्यार्थ, गीताप्रेस, तृतीय पुनर्मुद्रण, पृ. क्र. १६]
२) डॉ. देशपांडे, अ. ना. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास' व्हीनस प्रकाशन, पुणे, प. आ. जुलै १९६९, पृ. क्र. ३१४
३) संपा. भागवत, र. ह. 'सार्थ उपनिषदसंग्रह' भाग पहिला, वैद्यकपत्रिका पुणे, प. आ. सन १९१४, पृ. क्र. ५